# बृहन्मुंबई महानगरपालिका

## प्रकरण एक :

**परिचय :-** **खात्याचे नांव**
**प्रमुख अभियंता (यांत्रिकी व विद्युत)**

### खात्याचा थोडक्यात परिचय:-

प्रशासकीय कामकाजासाठी प्रमुख अभियंता (यांत्रिकी व विद्युत) हे खाते उप आयुक्त ( पर्यावरण) आणि अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प) यांच्या नियंत्रणाखाली येते.

प्रमुख अभियंता (यांत्रिकी व विद्युत) हे खाते, पा.पु.म.नि. म्हणजेच “जी” अर्थसंकल्प धरुन वेगवेगळया अर्थसंकल्पाखाली येणाऱ्या विविध खात्यांकरिता यांत्रिकी आणि विद्युत कामे पार पाडतात. हे खाते मध्यवर्ती संस्था म्हणून कार्यरत असून ते इतर खात्यांसाठी महसूल व भांडवली अर्थसंकल्प, ह्यामधून कामे पार पाडते.